आर.सी.सी.क्र.५११/२०२५
शासन वि. गुलाब शेख
नि.क्र.१५

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ ची शपथेवर जबाब
माझे नांव – फेरोज खान नजीर खान पठाण,
माझे वय – ५९ वर्ष , धंदा : मजुरी
राहणार – हकीम मोहल्ला, जालना, ता. जि. जालना.

<u>**सरतपासणी सहाय्यक सरकारी वकील श्री. पी. एल. वरपे यांच्यामार्फत सूरू**</u>

०१. दि.२१.०१.२०२५ रोजी मामा चौक बिलाल मस्जीदच्या गेटसमोर रात्री ०९.०० वाजता घटना घडली. माझा मुलगा आवेजखान हा दवा मार्केट मधुन डयुटीकरुन दुचाकी क्र.एम.एच.२१–बी.एम.९५११ ने घरी येत होता. माझ्या मुलाचा मित्र मुस्तफा याचा मला फोन आला की, तुमच्या मुलाचा अपघात झाला असुन त्याला घाटी दवाखान्यात नेले आहे. सदर माहिती मिळाल्यानंतर मी दवाखान्यात गेलो. तेथे डॉक्टरांनी सांगितले की, त्याला औरंगाबाद येथे घेऊन जावे लागेल. मुलाला औरंगाबादला घेऊन जात असतांना त्याची तब्येत जास्त खराब झाल्यामुळे आम्ही त्याला जे. जे. हॉस्पीटल, बाबा पेट्रोल पंप जवळ, औरंगाबाद येथे नेले. तेथे डॉक्टरांनी त्याला तपासुन मृत घोषीत केले. मुस्तफा याने असे सांगितले की, माझ्या मुलाला ट्रक क्र.एम.एच.०४ ई.एल.३१०१ च्या चालकाने पाठीमागुन धडक दिली आहे. सदर अपघातामध्ये माझ्या मुलाला उजव्या हाताला व डाव्या पायाला गंभीर दुखापत झाली होती. पोलीसांनी माझा पुरवणी जबाब लिहुन घेतला होता. मुलाला घाटी रुग्णालय जालना येथे शवविच्छेदनासाठी घेऊन आलो. त्यानंतर मी फिर्याद दाखल केली. आता मला जबाब/फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१६** देण्यात येते. ज्या ट्रकने अपघात झाला तो दाखविल्यास मी ओळखु शकतो. ट्रक चालकाचे नाव मला मुस्तफा याच्याकडुन समजले. ट्रक चालक आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

आर.सी.सी.क्र.५११/२०२५
शासन वि. गुलाब शेख
नि.क्र.१५

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. एम. कुलकर्णी यांच्यामार्फत सुरु–**

०२. हे म्हणणे खरे आहे की, घटना मी प्रत्यक्ष पाहिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ शहराच्या मध्यभागी असुन रहदारीचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे आहे की, मस्जीदच्या आतमध्ये मदरसा आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे तेथे नेहमी मुलांची जा ये होत असते. हे म्हणणे खरे आहे की, मुलाच्या मित्राने घटना सांगितल्यानंतर मी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, अपघात माझ्या मुलाच्या चुकीमुळे झाला. हे म्हणणे खरे नाही की, नुकसान भरपाई मिळण्यासाठी खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची काहीही चुकी नाही. माझे शिक्षण बी. ए. पर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/–

(सि. म. पाडोळीकर)
दि. २३.०६.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.